# संत व संविधानातून मानवता

संशोधक विद्यार्थी : संतोष रघुनाथ कांबळे
भाषा, वाङ् मय आणि संस्कृती अभ्यास संकुल, नांदेड.

महाराष्ट्र वारकरी संप्रदाय हा अठरा पगड जातींना मिळून एकत्र आलेला आहे यामध्ये तळागाळातील सर्वांना समावेश करणारा हा वारकरी संप्रदाय आहे. विठ्ठल आणि रुक्माई हे त्यांचे आद्य दैवत. "जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले,

तोचि साधू ओळखावा, देव तिथेच जाणावा." एवढे मोठेपण मानवतेला संतांनी दिलेली आहे. त्यामुळे संतांची शिकवण ही मानवतेचा उद्धार करणारी शिकवण आहे. संत परंपरेत संत बहिणाबाई, संत सोयराबाई, संत जनाबाई, संत मिराबाई, संत निर्मलाबाई यांनी आपल्या अभंगातून मानवी जीवनाचा उद्धार केलेला आहे. स्वतः स्त्री असून संत जनाबाई त्या कालखंडामध्ये स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नसताना त्या म्हणतात "हातामध्ये टाळ, खांद्यावरती विना, आता मज मना कोण करी!"अशी विचारप्रणाली त्या कालखंडामध्ये संत जनाबाईंनी प्रकट केलेली आहे. संत परंपरेने केलेले मोलाचे कार्य मानवतेला वाहिलेलेच आहे. यामधूनच मानवतेचा उधार या कालखंडामध्ये संत परंपरेने कशा पद्धतीने केलेला आहे आपणास पुढील पद्धतीने सांगता येत.

**<u>संतांनी प्रकट केलेली मानवता :-</u>**

नामदेव हे वारकरी संप्रदायाचे प्रथम संत, आद्य अभंगकार,वारकरी कीर्तनाचे उदाते, संतश्रेष्ठ म्हणून त्यांची ख्याती आहे.'नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' म्हणत त्यांनी दक्षिणेकडील कर्नाटक, आंध्र, तमिळनाडू आणि उत्तरेकडील गुजरात, राजस्थान, दिल्ली, पंजाब या प्रांतांची यात्रा केली. आदर्श मानवी मूल्यांची जपणूक, लोकाभिमुख शासन प्रशासनाची निर्मिती व सार्वभौम एकात्म राष्ट्रभावनेचा विकास करणारा महाग्रंथ म्हणजे भारतीय संविधान! जी राष्ट्रनिर्माणाची तत्त्वे आणि जे मूलभूत अधिकार संविधानाने स्थापित केले, त्यांचा उद्घोष संत नामदेवांच्या अभंगवाणीत आणि पर्यायाने वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानात सातशे वर्षांपूर्वी पहावयास मिळतो, कर्मकांडाने सामान्य स्त्री-पुरुषांची केलेली कोंडी फोडायचे काम वारकरी संप्रदायाने केले. प्रसंगी त्याची किंमतही मोजली. ज्याला संविधानात अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हटले आहे, त्याचा उत्तम अविष्कार आपणास नामदेवादी वारकरी संतांच्या अभंगवाणीत दिसतो. संविधानाच्या प्रास्ताविकात विचार, अभिव्यक्ती, विश्वास, उपासना आणि श्रद्धा यांचे स्वातंत्र्य सांगितले आहे. संत नामदेव, ज्ञानदेव, तुकारामांनी त्यांच्या काळात या गोष्टींचा जोरदार पुरस्कार केला होता. संविधानाने जो सामाजिक समतेचा विचार सांगितला आहे, त्याचे आचरण संतांनी स्वतः केले होते. म्हणूनच शिंपी, सोनार, माळी, कुंभार, महार, कुणबी, ब्राह्मण आणि स्त्रिया यांना या वारकरी संप्रदायात 'संधीची समानता' होती. नामदेवांनी दासी असणाऱ्या जनाबाईला मार्गदर्शन करून संत होण्याइतका अधिकार प्राप्त करून दिला होता. देवाशी भांडणारी, देवाला शिव्या देणारी बंडखोर कीर्तनकार जनाबाई स्वतःला 'नामयाची दासी जनी' म्हणविते. भक्तीचा दोर गळ्यात टाकून मी पंढरीचा चोर धरला आहे, असे म्हणते. 'हातामध्ये टाळ, खांद्यावरी विणा,

आता मज मना कोण करी? ' असा प्रश्न विचारत भक्तीच्या मार्गावरून चालू लागते. तेव्हा भारतीय संविधानाने सांगितलेले स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व पंढरपूरच्या महाप्रांगणात शेकडो वर्षांपूर्वीच रुजलेले दिसू लागते. त्यामुळेच आज हजारो स्त्री-पुरुष मोठ्या विश्वासाने वारीतून चालत जाताना दिसतात. चोखामेळाला संत नामदेवांनी आपल्या वारकरी संप्रदायामध्ये समाविष्ट करून घेतलेले आहे त्यांना शिष्य म्हणून व संत म्हणून त्यांना सर्वांनी मान्यता दिलेली आहे. अस्पृश्यता नष्ट करण्याचे मूलभूत तत्व आपणाला संविधानाने दिलेले आहे. मात्र या तत्त्वाचा वस्तुपाठ संत नामदेवांनी सातशे वर्षांपूर्वी घालून दिला आहे. 'ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा। काय भुललासी वरलिया रंगा ।।' म्हणणारे चोखामेळा समाजाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालतात. आत्मपरीक्षण करायला भाग पाडतात. परंतु याच चोखोबांचे मंगळवेढा येथे गावकुस बांधताना दरड अंगावर कोसळून निर्वाण होते. दगडमाती खाली गाडलेल्या अस्पृश्याचा मृतदेह कोण वर काढणार? कोण त्याचे अंत्यसंस्कार करणार? पण जेव्हा नामदेवांना हे समजते तेव्हा ते स्वतः तिथे जातात. चोखोबांच्या अस्थी शोधून पंढरपुरात विठ्ठल मंदिराच्या महाद्वारात या संताची समाधी उभी करतात. एका सुप्रसिद्ध मंदिराच्या दारात अस्पृश्य गणलेल्या संताची समाधी हे क्रांतिकारक पाऊल म्हणावे लागेल. भारतीय संविधान कायद्यासमोर सर्व समान असे सांगते. सर्वांना समान न्याय आणि संरक्षण सांगते. धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या आधारे भेदभाव केला जाणार नाही, अशी ग्वाही देते. परंतु असा आदर्श व्यवहार संतांनी त्यांच्या काळात केला होता, याची आपणास नोंद घ्यावी लागेल. संन्याशाची पोरं म्हणून संबोधले गेले होते अशा संत नामदेव, संत ज्ञानदेव भावंडाची अवहेलना करण्यात आली होती. धर्मसभेने ज्यांचे ब्राह्मणत्व नाकारले, चांडाळ संबोधले, जाती नाही त्याची कायसी पंगती' असे ज्या काळाचे सामाजिक वास्तव होते, त्या काळात शेतकरी, कष्टकरी, दीनदलित, स्त्रिया यांना आत्मविश्वास देण्याचे कार्य नामदेवांनी केले. भारतीय संविधानाने श्रद्धेला मान दिलेला आहे परंतु अंधश्रद्धेला त्यांनी मान्य दिलेला नाही. त्याच पद्धतीने संत नामदेवांनी कर्मकांडाला स्थान न देता श्रद्धेला स्थान दिलेले आहेत.

संत नामदेवांनी आपल्या कार्यकाळात दक्षिण व उत्तर भारतात पाच तीर्थयात्रा केल्या. पहिली तीर्थयात्रा संत ज्ञानदेवांच्या आग्रहाने उत्तरेत केली. यानिमित्ताने या संतद्वयात झालेली चर्चा म्हणजे महाराष्ट्र संस्कृतीच्या उत्थानाचा सुवर्णबिंदू होता. ते संतांची दृष्टी अधिक व्यापक करणे होते. भक्तिमार्गाची सुस्पष्ट मांडणी या काळात झाली. पुढे नामदेवांनी पुन्हापुन्हा भारतभ्रमण करून आपल्या नव्या भक्तिमार्गाचा प्रचार-प्रसार केला. ते दीर्घकाळ पंजाबमधील घुमान येथे राहिले. त्यांनी उत्तरेत निर्गुण मताची पायाभरणी केली. पुढे संत नामदेवांच्या विचारातून प्रेरणा घेऊन शीख धर्माची स्थापना झाली. आजही पंजाबी माणूस 'बाबा नामदेवजी महाराज' म्हणून नामदेवरायांसमोर नतमस्तक होतो. त्यांच्या 'गुरुग्रंथसाहिब' मध्ये संत नामदेवांची ६१ पदे आदरपूर्वक समाविष्ट आहेत. संत कबीर, संत नरसी मेहता अशा संतकवींवर नामदेवांचा मोठा प्रभाव आढळतो. पंजाब, दिल्ली, हरियाणा, राजस्थान, जम्मू , गुजरात अशा सगळ्या उत्तर भारतात संत नामदेव या एकमेव वारकरी संताची हजारो मंदिरे आढळतात. हा त्यांचा राष्ट्रीय पातळीवर पोहोचलेला प्रभाव होय. भारतीय संविधानाने प्रत्येक भारतीयास भारतभर मुक्तसंचाराचे, कुठेही निवासाचे, स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य दिले आहे.

गाडगे महाराज हे गरीब आणि दलितांमधील अज्ञान, अंधश्रद्धा आणि अस्वच्छता निर्मूलनाचे कार्य करणारे समाजसुधारक होते. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी, परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यासाठी त्यांनी कीर्तनाचा मार्ग स्वीकारला. माणसात देव शोधणाऱ्या या संताने ठिकठिकाणी अनाथांसाठी धर्मशाळा, अनाथाश्रम, आश्रमशाळा सुरू केल्या. निराधार, दुर्बल, अपंग, अनाथ हे त्यांचे दैवत होते. या देवतांमध्ये गाडगेबाबा हे सर्वात लोकप्रिय होते. त्यांनी डोक्यावर जिंजा, खापराच्या तुकड्यापासून बनवलेली टोपी, एका कानात कवटी, दुसऱ्या कानात तुटलेला बांगडीचा आरसा, एका हातात झाडू आणि दुसऱ्या हातात घागर घातला होता. “तीर्थ धोंडपाणी देव रोकडा सज्जनी |” गरीब, दुर्बल, अनाथ, अपंग यांची सेवा करणारे महान संत गाडगेबाबा म्हणतात. “मंदिरात जाऊ नका, मूर्तीपूजा करू नका, सावकारांकडून पैसे घेऊ नका, गावकरी होऊ नका, पोथी-पुराण, मंत्र-तंत्र, देवी चमत्कारांवर विश्वास ठेवू नका. त्यांनी आयुष्यभर लोकांना शिकवले. संत ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतांचे रूपांतर मराठी मध्ये करून ती जनसामान्यापर्यंत पोहोचवली आहे. मानव कल्याणासाठी त्यांनीअथक परिश्रम घेतलेले आहे. तुकारामांचे स्वयंपूर्ण अव्यावहारिक भाषण सर्वसामान्यांनाही अतिशय प्रिय आहे. याचे मुख्य कारण म्हणजे सामान्य माणसाच्या हृदयात उत्पन्न होणारे सुख, दु:ख, आशा, निराशा, आसक्ती, लोभ इत्यादी भावना त्यात दिसून येतात. तुकारामांच्या वाङ्मान्याने लोकांच्या हृदयात स्थान मिळवले आहे. ज्ञानेश्वर, नामदेव आदी संतांनी भागवत धर्माची पताका आपल्या खांद्यावर घेतली होती पण तुकारामांनी आपल्या हयातीतच ते एका उच्च स्थानावर फडकवले. त्यांनी अध्यात्मिक ज्ञान सुलभ केले आणि भक्तीचा प्रसार करून भक्तीचा मार्ग वृद्धांपर्यंत सहज उपलब्ध करून दिला.

**भारतीय संविधान आणि मानवी हक्क**

मानवाधिकारांवरील सार्वत्रिक घोषणापत्र तयार करण्यात भारताने सक्रिय सहभाग घेतला. भारतीय शिष्टमंडळाने संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरचा मसुदा तयार करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले, विशेषतः लैंगिक समानता प्रतिबिंबित करण्याची गरज अधोरेखित करण्यात. भारत सहा मूलभूत मानवी हक्क करार आणि बाल हक्कांच्या कराराच्या पर्यायी प्रोटोकॉलवर स्वाक्षरी करणारा आहे. भारतीय राज्यघटनेच्या अंमलबजावणीनंतर, सार्वभौमिक घोषणेचे बहुतेक अधिकार त्याच्या दोन भागांमध्ये समाविष्ट केले गेले आहेत मूलभूत अधिकार आणि राज्य धोरणाचे निर्देशक तत्त्वे, जे मानवी हक्कांच्या सार्वत्रिक जाहीरनाम्याच्या जवळजवळ क्षेत्रांचा समावेश करतात.

अधिकारांच्या पहिल्या संचामध्ये घोषणेच्या अनुच्छेद 2 ते 21 आणि संविधानाच्या अनुच्छेद 2 ते 35 मध्ये अंतर्भूत मूलभूत अधिकारांचा समावेश आहे. यामध्ये समानतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, शोषणाविरुद्धचा अधिकार, धार्मिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक स्वातंत्र्याचा अधिकार, काही कायद्यांमधून सूट आणि घटनात्मक उपायांचा अधिकार यांचा समावेश होतो.

अधिकारांच्या दुसऱ्या संचामध्ये कलम 22 ते 28 मधील घोषणा आणि संविधानाच्या अनुच्छेद 36 ते 51 मधील राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे यांचा समावेश होतो. यामध्ये सामाजिक सुरक्षा, काम करण्याचा अधिकार, रोजगार निवडीचे स्वातंत्र्य, बेरोजगारीपासून संरक्षण, कामाची सुरक्षा आणि

सोयीस्कर कामाची परिस्थिती, समान कामासाठी समान वेतन, मानवी प्रतिष्ठेचा आदर, विश्रांती आणि विश्रांतीचा अधिकार यांचा समावेश आहे, समुदायाच्या सांस्कृतिक जीवनात अखंड सहभागाचा अधिकार. मोफत आणि सक्तीचे शिक्षण, लोकांच्या कल्याणाचा प्रचार, समान न्याय आणि मोफत कायदेशीर मदत आणि राज्याने पाळल्या जाणाऱ्या धोरणाची तत्त्वे यांचा समावेश आहे. तथापि, सामाजिक तत्त्वज्ञानाचा एक भाग म्हणून मानवी हक्कांबद्दलचा आदर भारतीय लोकांमध्ये दीर्घकाळापासून आहे.

**समानता**:-

भारतीय संविधानाने सर्व देशवासीयांना समानतेचा अधिकार देऊन सर्वांसाठी एकच कायदा या पद्धतीची रचना करण्यात आलेली आहे. सर्वधर्म समावेशक एकतेची भावना जोपासुन समानतेचा अधिकार सर्व जाती धर्मांना देण्याचा अधिकार येथे संविधानाने प्रदान केलेला आहे. इथे उच्च श्रेष्ठ कनिष्ठ असे कोणीही नसून सर्व समान आहेत.

**बंधुता :-**

आपण या राष्ट्राचे सार्वभौम नागरिक असून सर्वांमध्ये बंधुत्व नांदावे यासाठी बंधूभावता हा संविधानाचा महत्त्वाचा घटक येथे सांगितलेला. भारतामध्ये विविध धर्मातील लोक एकत्र येऊन राहतात या सर्वांचे धर्माची वैशिष्ट्य वेगवेगळे असून त्यांच्या धर्म स्वातंत्र्यावरती गदा न येता सर्वांनी एकत्र येऊन आम्ही सर्व भारतवासीय एक आहोत या भावनेने बंधूभावता जोपासणे महत्वाचे संविधानामध्ये सांगण्यात आलेले आहे.

**न्याय:-**

भारतामध्ये प्रत्येक नागरिकाला समान न्यायाचा अधिकार देण्यात आलेला आहे. येथे कोणीही उच्च, श्रेष्ठ, कनिष्ठ, श्रीमंत किंवा गरीब असे नसून प्रत्येकाला एकच न्याय देण्याचा प्रयत्न केला गेलेला आहे. त्यामुळे सर्व व्यक्तींना समान न्याय व समान हक्क भारतीय संविधानाने दिलेला आहे

भारतीय संविधान हे मानवहित, देशहित, राष्ट्रहित, जोपासणारे असून यामधून मानवता हा संदेश दिलेला आहे. सर्व जाती धर्मातील मानव हे एकच आहेत व त्यांना न्याय संस्था एक न्याय पद्धतीनेच न्याय देते व सर्वांना समानतेचा अधिकार प्रदान करते. जेव्हा एका कुटुंबात अनेक धर्माचे लोक एकत्र असतील तेव्हाच वसुदेव कुटुंब होईल. भारतीय संविधानाने धर्म स्वातंत्र्याची व आंतरजातीय विवाहला देखील प्राधान्य दिलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शालेय जीवनामध्ये शाळेमध्ये बसण्याचा देखील अधिकार नव्हता. आज संविधानामुळे सर्वांना शिक्षणाचा अधिकार मिळालेला आहे. त्यामुळे संविधानाने मानवाला मानवतेचा अधिकार प्रदान केलेला आहे व मानवता हा सर्वात मोठा धर्म येथे मानला गेलेला आहे. या अनुषंगाने भारतीय संविधानाची महती आपणास मानवतेकडे झुकलेली आढळते हे आपणास येथे स्पष्ट समजते.

संत आणि संविधानाने मानवाला मानवतेकडे नेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

संत परंपरा आणि भारतीय संविधानामध्ये मानवतेला अनुसरून विविध कार्याची महती आपणास येथे पहावयास मिळेल. माननीय हक्कासाठी येथे मोठ्या प्रमाणात कार्य करण्यात आलेले आहे. सर्व मानव

समान व सर्व मानवासाठी एकच कायदा या प्रणालीमध्ये संतांपासून आजच्या भारतीय संविधानापर्यंत आपणास वाटचाल करताना आपण पाहतो. भारतीय भारतीय संविधानाने मानवाला विविध अधिकार देऊन त्याची कायद्यामध्ये तरतूद देखील केलेली आहे. पूर्वीच्या काळी स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. अस्पृश्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. परंतु आजच्या घडी मध्ये सर्वांना शिक्षणाचा अधिकार भारतीय संविधानाने प्रदान केलेला आहे. याच पद्धतीने मानवाला मानवतेकडे नेणारे भारतीय संविधान हे सर्वधर्म समावेशक विचार प्रणालीतून मानवता या दृष्टिकोनातून कार्य करते.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**


1) **संत साहित्य दर्शन...............................डॉ उषा देशमुख.**
2) **आधुनिक संत आणि समाज................रवींद्र गोळे.**
3) **संतसाहित्यातील सामाजिकता........ डॉ.तानाजी राऊ पाटील.**
4) **भारतीय संविधान संक्षिप्त परिचय........अवधूत डोंगरे.**
5) **भारतीय संविधान.............डॉ. महेश शिरापूरकर, तुकाराम जाधव,**